# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## कर आकारणी विभाग

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-‘ड’, प्रकरण ८ (कराधान नियम) नियम १३ व १५ अन्वये.)**

## जाहिर नोटिस

नाशिक महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतधारक/भोगवटादार यांना कळविण्यात येते की, सन २०२२-२३ करीता आकारणी रजिष्टर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची-‘ड’ प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ९ खंड (क), (ख), (ग) आणि (घ) अन्वये आवश्यक असलेल्या नोंदी, व्यवहार्य असेल तितपत, पुर्ण करण्यात आल्या आहे. व नियम २१ (१) अन्वये निकट पूर्वीच्या वर्षाच्या (सन २०२१-२२) पुस्तकातील नोंदी नवीन वर्षाच्या नोंदी म्हणुन सन २०२२-२३ करिता स्विकारल्या आहेत.

मालमत्ता कर आकारणी पुस्तक (नोंदवही) महानगरपालिकेच्या नाशिक पूर्व, नाशिक पश्चिम, पंचवटी, नाशिक रोड, सातपूर व नविन नाशिक या विभागीय कार्यालयात मिळकतीची माहिती मिळकतधारक/भोगवटादार यांना पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

ज्या मिळकतधारक/भोगवटादार यांना मिळकतकर आकारणी पुस्तकामधील खालील बाबींवर तक्रार अथवा हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांचे कारणासह लेखी स्वरुपात, संबंधित विभागीय कार्यालयात दि.२५/०२/२०२२ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अगर तत्पूर्वी मिळेल अशा रितीने समक्ष अथवा पोस्टाद्वारे सादर करावयाचा आहे.

१. इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मूल्य चुकीचे नोंदविले असल्यास.
२. घर क्रमांक, पत्ता व मिळकत मालकाचे/धारकाचे नाव चुकीचे नोंदविले असल्यास.
३. इमारत अथवा जमिनीवर मालमत्ता कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव चुकीचे नोंदविले असल्यास.
४. जमिन अथवा इमारतीचे भाडे मूल्यात वाढ अथवा घट केली असल्यास.
५. इमारत अथवा तिचा काही भाग निष्काशीत केला असल्यास किंवा इमारत अस्तित्वात नसल्यास.
६. मिळकतीच्या वापरात बदल केला असल्यास तसेच मिळकतीचा भाडेतत्वावरील वापर, मालकीतत्वावर सुरु असल्यास.
७. खुल्या भुखंडा (ओपन प्लॉट)वर इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन बांधीव मिळकतीवर मालमत्ता कर लागु असल्यास, खुल्या भुखंड (ओपन प्लॉट) वरील कर रद्द करणे बाबत.

उक्त कारणांकरीता हरकत अर्ज करतांना चालू वर्षासह (दि. ३१/०३/२०२२ पावेतो) कराची थकबाकी भरल्याखेरीज तक्रार अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच सदरहु मिळकतीबाबत यापुर्वी ज्या कारणास्तव निकाल दिलेला आहे, अशा प्रकारचे तत्सम मुद्द्यांचे पुर्नर अर्ज तसेच नियम १६ (२) प्रमाणे ज्या कारणांवरुन मुल्य निर्धारणा विरुध्द तक्रार करण्यात आली आहे, ती कारणे थोडक्यात, परंतु संपूर्णपणे नमूद करण्यात आली पाहिजेत याप्रमाणे नसल्यास अशा अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

सदरहु नोटीसमध्ये नमुद कालावधी नंतर येणाऱ्या हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच प्रत्येक मिळकतींच्या हरकतींसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

तरी सर्व मिळकतधारक/भोगवटादार यांनी हरकत असल्यास दिलेल्या मुदतीत नोंदविण्यात याव्यात तसेच इमारत/जमिन मालकीच्या करदायित्वाच्या मूळ नावात बदल करण्याकरिता /वैयक्तिक बिलाकरिता स्वतंत्रपणे कधीही अर्ज करता येतील त्याचा हरकत अर्जामध्ये विचार केला जाणार नाही.

xxx
उपआयुक्त (कर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

xxx
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक